# वाशिम यशोगाथा

## ‘प्रधानमंत्री मुद्रा योजना’ मुळे मिळाले पुस्तकी रोजगार

नाव : दत्ता वाशीमकर

मोबाईल न. : ८८८८७३१७१५.

गाव : वाशिम

व्यवसाय : चालते फिरते पुस्तकालय

वाशिमयेथे वास्तव असणारे दत्ता वाशीमकर, घरात अठराविश्व दारिद्य्र,हलाखीची परिस्थिती आणि इच्छाशक्ती असून हि यश मिळेना. काही करूण हि रोजगाराचे योग्य साधन त्यांना मिळेनासे झाले, खूप प्रयत्नानंतर दत्ता यांनी पुस्तकाचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला परंतु अपुर्या भांडवलामुळे हा व्यवसाय सुरु करणे त्यांना शक्य होत नव्हते, तरी सुद्धा परिस्थितीसोबत झगडून त्यांनी एक पिशवी मध्ये पुस्तक घेऊन डोअर टू डोअर पुस्तक विक्रीचा व्यवसाय सुरु केला. हळू हळू त्यांना या व्यवसायात यश मिळत होते आणि व्यवसाय स्थायिक करण्याचा त्यांनी निर्णय घेतला त्याकरिता त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र चे व्यवस्थापकांची भेट घेतली. व्यवस्थापक साहेबान्नासोब्त चर्चा करून त्यांनी ‘मुद्रा’ अंतर्गत कर्ज मंजूर करण्याचे ठरले. त्यानुसार दत्ता यांना ५० हजार रुपयाचे कर्ज मंजूर करण्यात आले आणि त्यातून त्यांनी एक जुनी चार चाकी आणि काही पुस्तकांची खरेदी करून स्थायिक पुस्तकालय अर्थातच ज्ञानालय सुरु केले. आज त्यांच्या व्यवसायाची एकूण गुंतावूक जवळ जवळ ५ लाख पर्यंत पोहचली असून मासिक उत्पन्न रुपये ५० ते ६० हजार मिळत आहेत, नियमित कर्ज परत फेड करत असून व्यवसाय सुरळीत सुरु आहे.

